## नि.क्र.१० वर आदेश
(दि.११.०७.२०१९)

रूणको यांनी सदरच्या प्रकरणात त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याकरीता परवानगी मागीतली आहे. रूणको यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, रूणको क्रं.२ ही आजारी असल्यामुळे त्यांना सदरील प्रकरणात लेखी म्हणणे देण्यास विलंब झालेला होता. त्यामुळे दि.१२/०३/२०१८ रोजी रूणकोंच्या विरूध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. रूणको यांना लेखी म्हणणे सादर करण्याकरीता त्यांच्या विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

२) धनकोच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, रूणको यांनी सादर केलेला अर्ज हा चुकिचा असुन कायद्याच्या विरूध्द आहे. धनको यांनी दि.०१/०१/२०१८ रोजी सदरील प्रकरण दाखल केले होते. तसेच, रूणकोंना सदरील प्रकरणाची नोटीस प्राप्त होउन सुध्दा ते हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरूध्द दि.१२/०३/२०१८ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. दि.२८/०९/२०१८ रोजी धनकोने घर क्रं.३६८ हे रिकामे करून ताब्यात मिळण्यासाठी कोर्ट कमिश्नर नेमण्यासाठी अर्ज सादर केला असता त्याचदिवशी रूणकोंनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. रूणकोंनी सदरचा अर्ज हा फक्त सदरच्या प्रकरणाच्या विलंबाकरीता दाखल केला आहे. रूणकोंनी नि.दि.दावा क्रं.१३०/२०१० च्या विरूध्द अपिल केलेले नाही. त्यामुळे रूणकोंचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३) सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, रूणको यांना सदरच्या प्रकरणाची नोटीस ही दि.०४.०१.२०१८ रोजी प्राप्त झाली तरी ते सदरच्या प्रकरणात हजर न झाल्यामूळे दि.१२.०३.२०१८ रोजी त्यांच्याविरूध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. रूणको यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश हा रद्द करुन त्यांनी लेखी म्हणणे सादर करण्याची परवानगी मागीतली आहे. रूणको यांचा अर्ज न्यायदानाच्या दृष्टीकोनातुन मंजूर केल्यास धनकोचे कोणतेही नुकसान होणार नाही. रूणको यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर

घेतल्यास सदरच्या प्रकरणाची वस्तुस्थिती ही न्यायालयासमक्ष येईल व सदरचे प्रकरण हे निकाली काढतांना न्यायालयास मदत होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. रूणको यांच्या विरुध्द दि.१२/०३/२०१८ रोजी पारीत केलेला एकतर्फा आदेश हा रद्द करण्यात येतो आणि त्यांचे लेखी म्हणणे हे अभिलेखावर घेण्यात येते.

अहमदपूर.
दिनांक : ११.०७.२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S.Kodgire |
| Dictated on | : | 11.07.2019 |
| Checked on | : | 11.07.2019 |
| Signed on | : | 11.07.2019 |
| Uploaded on | : | 11.07.2019 |